Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# भारतीय धर्मपरंपरेतील एक प्रवाह : नाथपंथ

**एम.जी .महाके**
(सहा.प्राध्यापक)
इतिहास विभाग
म.ऊ.मऊ.महा. विद्यालय उदगीर

**प्रस्तावना**

डॉ.रा.ना.जोशी यांच्या मतानूसार हिंदू धर्माइतकी विविधता व अंतर्भेद जगाच्या इतर कोणत्याही धर्मामध्ये व तत्त्वज्ञानामध्ये पहावयास मिळत नाही. भारतातील अनेक पंथ, संप्रदाय यामुळे भारतातील सहिष्णूता, एकात्मता याचे जतन झाल्याचे दिसते धार्मिक समन्वयावादामुळे मुलतः अनेक पंथ, उपपंथ संप्रदाय या मध्ये हिंदू धर्म विभागला तरी या धर्माची तात्वीक अधिष्ठान बळकट असल्याचे दिसते. शंकराचार्यामूळे दर्शनाची श्रेष्ठ परंपरा भारतात रुजली गेली व भक्ती संप्रदाय हा रामानुजाचार्याच्या प्रेरणेने लोकप्रीय बनला परंतु तो मुख्यतः वैष्णवाचा मार्ग समजला जातो मात्र शिवाला आदिदैवत मानणारे व सर्वस्व अर्पण करणारे शैवसंप्रदायाचे अनुयायी हे ही भक्ती संप्रदायचे एक आयाम असून शैव, शाक्त, तांत्रिक यांच्या शिकवणूकीचा परिणाम होवून नाथपंथ, महानुभव, वारकरी दत्त व समर्थ हे पंथ महाराष्ट्रात मान्यता पावल्याचे दिसतात नाथपंथ महाराष्ट्राच्या बाहेरही प्रचलीत आहे. इसवी. सनाच्या आठव्या शतकापासून साधारणतः जे तपस्वी, सिध्द साधक झाले यातून हे विविध संप्रदाय, पंथ यांचे पाळेमुळे रुजत गेल्याचे दिसते. इसवी. सनाच्या अकराव्या बाराव्या शतकात भारतात शैव मताचे प्राबल्य निर्माण झाले होते. बौध्द साधना, स्मार्त धर्माचा आश्रय, विज्यातील संस्कृतीचे आक्रमण यामुळे निर्गुणी नाथपंथाच्या उदयाची परंपरा निर्माण झाली, समन्वयवाद, निर्गुण ब्रम्हवाद, हठयोग, साधना ही नाथपंथाची वैशिष्टये असली तरी यांच्या शिकवणूकीचेचे सार सर्वसमावेशकता आणि लोककल्याण हे होते.

नाथपंथ सोडला तर बाकी सर्व पंथाच्या उगमाची प्रक्रिया १५ व्या शतकापासून सुरु झाली. मुस्लिम आक्रमकांना तोंड देण्यासाठी, त्यांच्या धार्मिक आक्रमणाला पचवण्यसाठी व धर्मांधतेला छेद देवून आपली धार्मिक अस्मिता जपण्यासाठी अनेक पंथ उपपंथ निर्माण झाल्याचे दिसते. परंतू याबाबतीत नाथपंथाचे खचीतच वेगळेपण आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश**

१. भारतीय हिंदू धर्मातील विविध धर्मप्रवाहात नाथ पंथाचे स्थान अभ्यासणे.
२. नाथ पंथाच्या उगमाबाबत अभ्यास करणे.
३. नवनाथ गणनेचा अभ्यास करणे.
४. नाथ पंथाचे भारतीय संस्कृतीसाठीचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी विवरणात्मक, वर्णनात्मक, संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. यासाठी विविध संदर्भग्रंथ, दुय्यम स्त्रोत यांचा आधार घेतला आहे.

**गृहितकृत्य**

१. नाथपंथ हा महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेरीत लोकमानसात रुढ पंथ आहे.
२. हठयोग प्रधान व निर्गुणप्रधान पंथ म्हणून नाथपंथाचा विचार करता येतो.
३. समाजातील अनाचार दूर करण्यासाठी, सहिष्णूता, वाढवण्यासाठी व स्थैर्य प्राप्त करण्याच्या दृष्टीने या पंथाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**नाथपंथाचा उगम**

बौध्द धर्माची पिछेहाट होत असताना साधरणतः इसनाच्या अकराव्या शतकात भारतात तंत्र साधनेला समाजात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते.[१] शक्तीसह आदिनाथ शिव हा उपद्रष्टा व तोच उपास्य असल्याने नाथपंथाला शांभव वा शैव म्हटले आहे तरी या पंथाचे मूळ नाव सिध्दमत असे आहे. अनादि स्वयंसिध्द जो आदिनाथ त्यापासून उद्‌भवलेला मार्ग तो सिध्दमार्ग होय.

नाथ पंथाच्या मुळ स्थानाबाबत संशोधकात मतभिन्नता आढळते. नाथ संप्रदायाचे मूळ म्हणून नाथ संप्रदायाच्या जन्मभूमीचा मान नेपाळ, पंजाब, उत्तर प्रदेश, आसाम या प्रदेशाला दिला जातो.[२] डॉ.मोहनसिंह, प्रो.ब्रिग्ज, डॉ.हजारीप्रसाद द्विवेदी, डॉ.कल्याणी मल्लिक या विद्वांनानी नाथ संप्रदायाचा उगम उत्तर भारतातील मानला आहे.[३] मात्र १४ व्या शतकातील गौरन्नमंत्री तेलगू कवीच्या नवनाथचरित्रमु या ग्रंथात नवनाथाचा समावेश आहे. याबरोबरच 'कदलीमन्जूनाथ महात्म्य' या ग्रंथात मंजूनाथाला (आदिनाथास) कदलीश्वर म्हटले आहे. या ग्रंथानूसार श्रीशैल व कदलीबन हे भौगोलिक दृष्टीने एकच मानले जाते.[५] या काळात श्रीशैल पर्वत हे तांत्रिक साधनेचे केंद्र बनले होते. याशिवाय नाथ संप्रदायाशी दृढ संबंधीत अशा चक्रधरांची त्याच्या एकांतकालीन भ्रमणात भतृहरी शिष्या मुक्ताबाई या नाथयोगिनीशी भेट झाली ही नाथयोगिनी मुक्ताबाई ही कदलीबनातील होती.[६]

नाथपंथाची उदयभूमी ही दक्षिणेतील श्री शैल-कदलीबन असून आंध्र-कर्नाटक-महाराष्ट्र या भागात व नंतर भारतभर या पंथाची वाढ झाली. परंतू याला सबळ पुरावा नाही. नाथ, तांत्रिक, शैव कापालिक, माहेश्वर आदि पंथाचा कदलीबनाशी संबंध आहे. विदर्भातील अंभोरा, बंगालमधील गंगासागर ही स्थळेही आदिनाथाशी निगडीत आहेत.

नाथपंथाचे नाव प्राचीन काळापासून प्रचलीत आहे. आदिनाथ 'सर्वेषां नाथानां प्रथमः तथे नाथसंप्रदायः प्रवृत्तः इति नाथसंपद्रायिनो वदन्ति' हे ब्रम्हानंदाने हठयोग प्रदीपीकेत नमूद केले आहे. 'ना' म्हणजे अनादी स्वरुप तर 'थ' अक्षरामूळे सिध्दी चा बोध होते.[८] 'न + अथ' म्हणजे ज्याचा प्रारंभ होत नाही असे म्हणता येईल.[९]

**नाथपंथाचे उपपंथ व उपशाखा :**

नाथपंथात बारा उपपंथ आहेत. या सर्व उपपंथात सुसुत्रता रहावी म्हणून त्यावर नियंत्रण करणारी एक मध्यवर्ती संघटना आहे या संघटनेला भेक बारा पंथ असे म्हणतात.[९] या संघटनेच्या प्रमुखास जोगेश्वर नाव आहे. आईपंथ, कन्हड पंथ, कपिलानी पंथ, गंगानाथी पंथ, धर्मनाथी पंथ, ध्वजपंथ, नाटेश्वरी पंथ, पागलपंथ, बैरागपंथ माननीय पंथ, रामपंथ, सत्यनाथी पंथ ही बारा पंथाची नावे आहेत.[१०] नाथपंथीचा कर्णकुंडले, धंधारी, किंगरी मेखला, जानवे, शृंगी, कंथा, दंडा, खापटी, अधारी रुद्राक्षमाला हा विशिष्ट प्रकारचा पोशाख असतो.

**नाथपंथाची पीठे**

नाथपंथाची चार पीठे आहेत

१. उड्डीयान
२. कामाख्या
३. श्रीहाट
४. पूर्णागिरी

या सोबतच जालंधरपीठाचाही काही ठिकाणी उल्लेख आढळतो. या चार पीठापैकी श्रीहाट व कामाख्या हे आसाम राज्यात आहे. कामरुप म्हणजेच कामाख्या हे आधारचक्रावर अधिष्ठीत असून कामप्रद आहे व हे शक्तीदेवतात्मक आहे.[११]

**नाथ पंथाचे वाङ्मय**

नाथ पंथाची परंपरा शिवापासून सुरु होते शिवाला आदिनाथ (मंजूनाथ) म्हटले आहे. संत ज्ञानेश्वराच्या मतानुसारही नाथपंथाचा प्रारंभ शिवापासूनच होते. मत्सेंद्रनाथ, जालंधरनाथ, गारेक्षनाथ, कानीफनाथ हे चौघे नाथपंथाचे प्रमुख आहेत.

मत्सेंद्रनाथाने कौलज्ञाननिर्णय, अतूल, वीरतंत्र, कुलानंद, ज्ञानकारिका हे ग्रंथ लिहले असून हे चारही संस्कृत भाषेतील आहे. जालंधरनाथाचे सात ग्रंथ आहेत तर कानिफनाथाचे ५७ ग्रंथ आहेत. गोरक्षनाथाचे ४० ग्रंथ आहेत असे डॉ.पीतांबरदत्त वडखाल यांचे मत आहे.[१२]

**नवनाथ परंपरा** नवनाथभक्तीसार या सांप्रदायिक मराठी पूराण ग्रंथात नवनाथ हे नव नारायणाचे अवतार मानले आहे.[१३]

१. कविनारायण- मत्सेंद्रनाथ
२. हरिनारायण- गौरक्षनाथ
३. अन्तरिक्षनारायण-जालंधरनाथ
४. प्रबुध्दनारायण-कानिफनाथ
५. पिप्पलायन- चर्पटीनाथ
६. अविर्होत्र-नागनाथ
७. द्रमिल नारायण-भर्तरीनाथ
८. करभाजन- गहनीनाथ
९. चमसानारयण-रेवणनाथ

नवनाथचरित्रमू या तेलगु ग्रंथात नवनाथ गणना पुढीलप्रमाणे सांगीतली आहे.[१४]

१) शिवनाथ २) नागार्जून ३) मीननाथ ४) सारंगधर ५) गोरक्षनाथ
६) मेघनाथ ७) विरुपाक्ष ८) सिध्दबुध्द ९) कर्णिक

राजाराम प्रसादीने भक्तमंजरीमाले मध्ये जे नावनाथ चरित्र गायले आहे त्यात ज्ञानेश्वरोत्तर परंपरेतील नवनाथाची नावे आहेत.[१५]

१) सत्यामलनाथ २) गैबीनाथ ३) गुप्तनाथ ४) उद्बोधनाथ ५) केसरीनाथ
६) शिवदिननाथ ७) नरहरीनाथ ८) लक्ष्मणनाथ ९) मल्हारनाथ

शाक्त, कापलिक, कौल आदि तांत्रिकांच्या ग्रंथात ज्या सिद्धगणना आहेत त्या गणनांतील ८,१२,१४ अशा संख्यांत मत्स्येंद्र, गोरक्षादी काही नाथसिद्धांचाही समावेश आहे.[१६]

नवनाथ गणनेचा एक सांप्रदायिक श्लोक रुढ आहे त्यात पुढील नावे आली आहेत.[१७]

१) गोरक्षनाथ २) जालंधरनाथ ३) चर्पटीनाथ ४) अडबंगनाथ ५) कानिफनाथ
६) मत्स्येंद्रनाथ ७) चौरंगीनाथ ८) रेवणनाथ ९) भरथरीनाथ

कदलीमंजूनाथ महात्म्यामध्ये पूढील नवनाथांचे वर्णन आलेले आहे.[१८]

१) मीननाथ २) कंथडीनाथ ३) गोरक्षणाथ ४) कोडणनाथ ५) विरुपाक्षनाथ
६) अनंतनाथ ७) जलंधरनाथ ८) चौरंगीनाथ ९) अरुणाचलनाथ

वेगवेगळया ठिकाणी सांगीतलेल्या नाम भिन्नतेमुळे नवनाथामध्ये समाविष्ट असलेले नाथ नेमके कोणते याबाबत एकवाक्यता दिसून येत नाही. नवनाथ गणनेची संकल्पनाही कधी उद्‌भवली याचीही निश्चित माहिती सांगता येत नाही मात्र ज्ञानेश्वरांच्या नंतरच्या काळात शिवदिनासारखे उत्तर कालीन नाथ 'नवनाथा'चा उल्लेख करतात.[१९] ज्ञानेश्वर समकालीन महानूभव कवी दामोधर पंडित याने एक नाथपंथी जोग्यासमोर 'नवनाथ कहे सो नाथपंथी' ही चौपदी रचून गायल्याचा उल्लेख हरिबास-सोंगोबास-कृत अन्वयस्थळा मध्ये आहे.[२०] प्रत्यक्ष गोरक्षानी ही 'नौ नाथ नै चौरासी सिद्धा' असा उल्लेख केला आहे त्यामूळेच नऊ नाथाची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे दिसते. नऊ नारायणाचे अवतार त्याप्रमाणे नऊ नाथाचे अवतार ही संकल्पनाही नाकारता येत नाही.

**नाथपंथाचे योगदान**

मध्ययुगीन भारतीय साधनेच्या इतिहासात नाथपंथीयांचे कार्य खूप महत्वपूर्ण आहे. या पंथाने वाममार्गी तांत्रिकाचा प्रचंड पराभव केल्यामुळे भारतीय साधनेचे मोठया प्रमणावर शुध्दीकरण घडून आले. नवनाथाच्या कार्यामुळे समाजात एकात्मतेची, सहिष्णूतेची वृत्ती निर्माण झाली. परकिय आक्रमणामुळे ग्लानी आलेल्या समाजाची अस्मिता जागृत करण्याचे कार्य नाथपंथाने केल्याचे दिसून येते. अस्पृश्यता, समाजातील वाईट प्रवृत्ती यासंदर्भातही या पंथातील सिध्दांनी अमूल्य मार्गदर्शन केले आहे. लोकोध्दाराची तळमळ, चित्तशुध्दी, शरीराचे साधनेतील महत्व लोकभाषेच्या सहाय्याने समाजाला मार्गदर्शन यामुळे हा पंथ सर्वत्र लोकप्रीय बनल्याचे दिसते. या पंथाने आत्मप्रमाण्याचा उद्‌घोष करुनही शास्त्राची अप्रतिष्ठ केली नाही. चित्तशुध्दीवर भर दिला पण आचारधर्माची अवहलेनाही केली नाही. स्त्रीला साधनेचे स्वातंत्र्य देवूनही मठात अनाचरास प्रवेश होवू दिला नाही.

विशुध्द, उदार व समन्वयशील स्वरुप यामुळे भारतभर नाथपंथाचा प्रभाव वाढला भारतातील सर्व भाषेत नाथ सिध्दा च्या गौरवगाथा उपलब्ध आहेत. भारतीय लोकसाहित्यातही नाथसिध्दांच्या महिम्याचे वर्णन आढळते. उत्तर भारतात कबीर व नानक या दोन महापुरुषांच्या विचारसरणीवरही नाथपंथाचा पभाव आढळतो त्याच्या द्वारा उत्तरेतील समग्र निर्गुणोपासक परंपराच नाथपंथाने पोसली आहे. महाराष्ट्रात ही नाथपरंपरा ज्ञानेश्वराच्या द्वारे जोपासल्याचे दिसते. गोरक्षनाथ- गहनीनाथ-निवृत्तीनाथ -ज्ञानेश्वर असे या परंपरेचे स्वरुप आहे. ज्ञानेश्वरानी दिलेला आत्मशुध्दीच्या शिकवणूकीमूळे, जगाच्या कल्याणाच्या तळमळीमुळे महाराष्ट्रात नाथ परंपरेचे, नाथ तत्त्वज्ञानाचे मूळे खोलवर रुजल्याचे दिसते.

समाजाला नितीमत्तेची चौकट घालून देवून स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी व अनेक परकीय आक्रमणानंतरही धर्मातील सहिष्णूता, एकसंघता टिकवण्यासाठी नाथपंथाचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

१. भारतातील अनेक धर्मसंप्रदाय म्हणजे भारतीय सहिष्णूता आणि एकता यांचे द्योतक आहे.
२. नाथपंथाचे भारतीय पंथ संप्रदायात अत्यंत महत्वपुर्ण स्थान आहे.
३. नाथ पंथ हा भारतीय संस्कृतीचा एक प्रधान निर्गुण पंथ आहे. या पंथाभोवती गुढतेचे वलय आहे.
४. नाथ पंथीयाचे ब्रम्हचर्य आणि योगसाधना सामान्य मानवाच्या धोरणापलीकडे असल्याने नाथ पंथाच्या विस्ताराला मर्यादा आलेल्या असल्या तरी या पंथातील सिध्दांच्या कार्यामुळे या पंथाचा सर्वत्र प्रसार झाला आहे व त्यांच्या शिकवणूकीमुळे सामाजिक उन्नयनही झाले आहे.
५. या पंथाचे ग्रंथसाहित्य योगसाधनेला प्राधान्य देणारे आहे व हा पंथ हठयोगाला आणि नानाविध मुद्रांना महत्वाचे स्थान देतो.
६. नाथ पंथाची उपासना, आचरण पध्दती जटील असली तरी हिंदू धर्म संस्कृतीच्या रक्षणासाठी नाथ पंथाचे योगदान महत्त्वपूर्ण आहे या पंथाच्याा प्रवर्तनापूर्वी बौध्द धर्माच्या तंत्रसाधनेत इतर पंथात अनेक विकृतीचा शिरकाव झाला होता या सर्व विकृती, अनाचार दूर करण्याचे कार्य नाथसध्दिंनी केल्याचे दिसते.

**संदर्भ सूची**

१. रा.चिं.ढेरे- नाथ संप्रदायाचा इतिहास, पद्मगंधा प्रकाशन, पूणे पृ.१६
२. कित्ता पृ.१७
३. डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर-नाथ संप्रदाय आणि ज्ञानेश्वर, पद्मगंधा प्रकाशन पूणे, २००७ पृ.१४
४. कित्ता पृ.१७
५. रा.चिं.ढेरे उपरोक्त पृ.२२
६. कित्ता पृ.२२
७. हठयोग प्रदिपीका, १.५ पृ.९
८. डॉ.कृ.ज्ञा.भिंगारकर, उपरोक्त पृ.१८
९. शंकर अभ्यंकर- भारतीय संप्रदाय, आदित्य प्रतिष्ठान, पूणे, पृ.३३५
१०. कित्ता पृ.३३६
११. कित्ता पृ.३३८
१२. कित्ता पृ.३३९
१३. नवनाथ भक्तीसार १.२७ पृ.४३
१४. तेलगू और उसका साहित्य पृ.२८
१५. नाथसंप्रदाय पृ.२४
१६. कित्ता २६-२७
१७. गोरक्षजालंधरचर्पराश्च अडबंगकानीकमछिदरराद्याः । चौरंगिरे वाणभर्त्रिसंज्ञाः भूम्या बहूपुर्नवनाथसिद्धाः ।।
१८. रा.चि.ढेरे उपरोक्त पृ.९६
१९. स्वानुभवदिनकर, ९.२ - ३२
२०. महाराष्ट्र साहित्य पत्रिका अं.१०६ सप्टे १९५० पृ.२६